# स्त्रियांची आंबेडकरवादी स्वकथने : एक दृष्टिक्षेप

**डॉ.बादलशाहा डोमाजी चव्हाण**

महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय,

बल्लारपूर, जि. चंद्रपूर

८००७९२८२२७

badalchawhan@gmail.com

**गोषवारा**

१९६० नंतर आंबेडकरवादी मराठी साहित्याचा उदय झाला. या साहित्यामुळे मराठीत एका क्रांतिकारी वाङ्मयाची भर पडली. ही विसाव्या शतकातील एक महत्त्वाची घटना आहे. इतिहासात प्रथमच शोषितांनी वाङ्मय लिहिण्यास सुरुवात केली. कधीही विषमतेबद्दल व स्वत:च्या जीवनाबद्दल न बोलणारा न लिहिणारा वर्ग लिहिता- बोलता झाला. आंबेडकरवादी मराठी साहित्यातील एक मौलिक ठेवा म्हणजे स्त्रियांची स्वकथने होत. १९८० नंतर आंबेडकरवादी स्त्रियांची स्वकथने प्रकाशित झाली. पारंपरिक समाजव्यवस्था आणि शिक्षणाचा अभाव यातून झालेली मानसिक आणि शारीरिक कोंडी हा स्त्रियांच्या, स्वकथनाचा गाभा आहे. स्त्री म्हणून आधीच तिचे जीवनातील स्थान सामाजिक दृष्टीने नगण्य होते. स्त्रियांच्या जीवनाची, समाजाच्या वेदनांची तीव्रता या स्वकथनात दिसते. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या स्वकथनांची संख्या कमी आहे. ही स्वकथने आंबेडकरवादी मराठी साहित्याची एक मोठी जमेची बाजू ठरली आहेत.

**बीजशब्द**

स्वकथन, चळवळ, सामाजिक, जीवन जाणिवा, परिवर्तन

**प्रास्ताविक**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषितांची चळवळ उभी केली. त्यांचे विचार शोषितांनी आत्मसात केले. बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर बहुजन समाजात नव्या जाणिवांचा उदय झाला. अनेक शतकांपासून ज्यांचा आवाज दबलेला होता त्यांच्या भावना आता उद्रेकातून व्यक्त होऊ लागल्या. जणू आंबेडकरवादी साहित्याचा हाच खरा आरंभबिंदू होय. सुरवातीला कवितेतून आणि नंतर कथा, कादंबरी, नाटक, स्वकथनातून स्व-जाणिवांसोबत सामाजिक जाणीव प्रकट होऊ लागली.

आंबेडकरवादी साहित्यातून वेदना, विद्रोह, नकार व्यक्त झाला. प्रस्थापितांच्या जीवनावेगळे बहिष्कृतांचे जीवन होते पण त्यामध्ये क्रांतीची बीजे होती. 'मी' ला केंद्रस्थानी ठेवून स्वकथनाची निर्मिती झाली. नंतर मी सोबतच सामाजिक जीवनही त्यात येऊ लागले. ही स्वकथने वेदनांच्या प्रवासाचा आलेखच आहेत. आंबेडकरवादी स्वकथनामुळे मराठी साहित्यात खळबळ उडाली. दया पवार, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, दादासाहेब मोरे, प्र. ई. सोनकांबळे, वसंत मुन, शरणकुमार लिंबाळे, पार्थ पोळके, नानासाहेब झोडगे, रूस्तम अचलखांब, किशोर काळे, तुषार भाग्यवंत, ईसादास भडके अशा कितीतरी लेखकांनी स्वकथने ऐन उमेदीच्या काळात लिहिली आहेत.

पुरुषांच्या स्वकथनांच्या तुलनेत स्त्रियांची स्वकथने कमी असली तरी ती आंबेडकरवादी जाणिवेतून लिहिली आहेत आणि स्वकथन हा साहित्यप्रकार समृद्ध केला. आपल्या जीवनाचा, अनुभवाचा आविष्कार स्वकथनातून व्यक्त केला. ही स्वकथने चिरडलेल्या स्त्री-मनाची, त्यांच्या भावभावनांची शब्दफुले आहेत. कुमुद पावडे 'अंत:स्फोट' (१९८१), मुक्ता सर्वगोड 'मिटलेली कवाडे'(१९८३), शांताबाई कांबळे 'माझ्या जन्माची चित्तरकथा'(१९८६), मल्लिका अमरशेख 'मला उद्ध्वस्त व्हायचं'(१९८४), बेबी कांबळे 'जिण आमुच'(१९९०), शांताबाई दाणी 'रात्रंदिन आम्हा' (१९९०), जनाबाई गीऱ्हे 'मरणकळा'(१९९२), नाजुबाई गावित 'आदोर'(१९९५), विमल मोरे 'तीन दगडांची चूल'(२०००), उर्मिला पवार 'आयदान'(२००३), यशोधरा गायकवाड 'माझी मी'(२००७) साधारणत: ही स्वकथने १९८० नंतर लिहिली गेली आहेत. पारंपरिक समाजव्यवस्था उद्ध्वस्त करू पाहणाऱ्या कष्टकरी,

अत्यंत यातनामय जीवन जगणाऱ्या स्त्रियांची आहेत. त्यांचे वय, अनुभव क्षेत्र वेगवेगळी आहेत. मात्र समाजाकडून स्त्री म्हणून मिळालेली वागणूक एकसारखी आहे. स्वकथनातील जीवन रूप व वाङ्मयीन रूप स्वतंत्र पद्धतीने विचारात घ्यावे असे आहे. त्यांनी आपला अनुभव यात मांडला. त्यामधील त्यांची तळमळ, उत्कंठा, भावनाशीलता, अनुभव मांडण्याची पद्धत, अवलोकन व्यक्त होण्याची शैली या गुणांमुळे ही स्वकथने मनात घर करून बसतात.

**'स्वकथन' लेखनामागील उद्देश**

साहित्यिक हा कोणत्या तरी हेतूने साहित्य निर्मिती करीत असतो. मराठीतील आत्मचरित्र आणि स्वकथने ही वेगवेगळी आहेत. आत्मचरित्र निर्मिती मागील हेतू हा आत्मसुख, वाचकांचे लक्ष केंद्रित करणे, आठवणींना उजाळा देणे, स्वत:चे गुणगान करणे इ. आहेत. स्त्रियांची आंबेडकरवादी स्वकथने त्यांच्या जीवनाच्या जवळची असली तरी ती वरील पैकी कोणत्याही हेतूने लिहिली गेली नाहीत. कारण या लेखिकांचे जीवनच हलाखीचे होते. त्यांनी स्वत:च्या दु:खाची नोंद घेण्याच्या उद्देशाने लेखन केल्याचे दिसते. स्वत:च्या अस्मितेचा शोध घेऊन समाजात आपले, समाजाचे अस्तित्व निर्माण करण्याच्या उद्देशाने ही स्व:कथने लिहिली आहेत. "प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सामाजिक शवचिकित्सा करण्याचाच या लेखनामागील हेतू असतो"[१] या समाजव्यवस्थेने स्त्रियांना सळो की पळो करून सोडले होते. म्हणूनच समाजाचे ऑपरेशन करण्याच्या हेतूने या स्वकथनांची निर्मिती झाली.

"साधारणत: परंपरा अशी दिसते की, आत्मचरित्र आयुष्याच्या उत्तरार्धाच्या अखेरीस लिहिले जाते. सिंह खूप दूर गेल्यानंतर, मागे वळून बघतो. त्याप्रमाणे माणूस आयुष्याच्या संध्याकाळी आपल्याच आयुष्याच्या मागे अवलोकन करीत असतो."[२] आत्मचरित्राच्या बाबतीत हे खरे असले तरी स्त्रियांच्या आंबेडकरवादी स्वकथनाबाबतीत हे लागू होत नाही. स्वत: रक्तबंबाळ होऊन आपले अनुभव लेखिकांनी त्यात मांडले आहेत. आपल्या अनुभवाचे दर्शन वाचकांना व्हावे यातून समाज परिवर्तन घडावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आंबेडकरवादी स्त्रियांनी स्वकथने लिहिलेली आहेत.

**वेदनांची ठसठस मांडणारी स्वकथने**

आंबेडकरवादी मराठी साहित्यामध्ये प्रामुख्याने स्त्रियांच्या स्वकथनांचा विचार करावाच लागतो. यात व्यक्त झालेली स्त्री ही समज परिवर्तनासाठी आसुसलेली आहे. समाज व्यवस्थेने स्त्रियांचे शोषण केले. त्यामुळे ती परिवर्तनाची वाटसरू झाली. ती शिक्षण घेऊन परिपक्व झाली. शिक्षणामुळे तिला नवी शक्ती मिळाली. आपल्या स्वकथनातून तिने मानसिक वेदनेची ठसठस मांडली. त्यांनी जे जीवन रेखाटले त्या जीवनाचे स्वरूप अस्वस्थ करणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि चळवळीमुळे स्त्री जागृत झाली. तिला माणूसपण मिळाले. पण तिच्या जीवनात ज्या उणीवा राहिल्या त्याचे प्रतिबिंब तिच्या स्वकथनात उमटले दिसते.

प्रा.सौ. कुमुद पावडे यांचे 'अत:स्फोट' हे स्वकथन मार्च १९८१ मध्ये प्रकाशित झाले. या स्वकथनाचे स्वरूप हे लेखसंग्रहासारखे आहे. एकूण नऊ लेख असलेल्या या स्वकथनात पंचावन्न पृष्ठ आहेत. बालवयापासून ते विवाह आणि नौकारीपर्यंत आलेल्या अनुभवाचे कथन त्यात आहे. "अत:स्फोट' मधून समाजातील दांभिकपणा आणि संकृतीचा सापत्नपणा त्यांनी आविष्कृत केला आहे."[३] समाजातील ढोंगाचा पर्दाफाश करण्याच्या आणि संस्कृतीचा उदोउदो करणाऱ्या लोकांची चिरफाड करण्याच्या हेतूने कुमुद पावडे यांनी हे स्वकथन लिहिले आहे. "तथाकथित उच्चभ्रू जीवन श्रेष्ठत्वाचा अभिमान बाळगणाऱ्या जातीचा फोलपणा सिद्ध करण्यासाठी त्यांनी 'अत:स्फोट' लिहिले आहे."[४] हे स्वकथन अंत:करणाच्या उर्मीतून लिहिले आहे. उच्चभ्रू समाजाने स्वत:च्या श्रेष्ठत्वासाठी स्त्रियांवर जो अन्याय- अत्याचार केला त्याचे प्रतिबिंब या स्वकथनात उमटले आहे. लेखिकेने स्वत:च्या जीवनातील वेगवेगळ्या अनुभवाची मांडणी केली आहे. त्यांनी पारंपरिक अनुभवाकडे आंबेडकरी दृष्टीने पाहिले आणि त्यामधील फोलपणा सांगितला. स्त्रियांनी जुन्या रूढी -परंपरांपासून स्वत:ची सुटका करावी आणि आधुनिक विचारांची कास धरून परिवर्तनवादी व्हावे असे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

मुक्त सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे' हे स्वकथन ५ नोव्हेंबर १९८३ मध्ये प्रकाशित झाले. स्वकथनाच्या शीर्षकातच खूप मोठा अर्थ आहे. लेखिकेचा जन्म एका दलित कुटुंबात झाला. नंतर त्यांनी दलितपण सोडून दिले. "यात माझ्या आयुष्यात अनुभवलेले प्रसंग गोवले आहेत. यातून समाजदर्शन घडावं हा माझा हेतू आहे. माझ्या आयुष्याच प्रदर्शन मांडण्याचा नाही."[५] समाजाचे दर्शन घडण्याच्या हेतूने हे स्वकथन लिहिल्या गेले आहे. त्यांनी समाजसेवेचे व्रत स्वीकारले आणि जातीयतेशी लढा दिला. समाजाचे नेते म्हणणाऱ्या बडव्यांना त्यांनी फटकारले. चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील आनंद वनातील कृष्ठरोगी आणि पिढ्यानुपिढ्या पासून

अस्पृश्यतेचे चटके सोसणारे यांच्या वाट्याला आलेल्या दु:खाची तफावत स्वकथनात मांडली आहे. त्यांनी मांडलेले अनुभव हे परिणामकारक असून मनात घर करून बसतात.

पारंपरिक व्यवस्थेबद्दल बंड करून उठणाऱ्या शांताबाई कांबळे यांचे 'माझ्या जन्माची चित्तरकथा' हे स्वकथन २० जून १९८६ मध्ये प्रकाशित झाले. शंकरराव खरात यांचे 'तराळ-अंतराळ' वाचल्यावर त्यांना स्वकथन लिहिण्याची प्रेरणा मिळाली. लहानपणापासूनच त्यांनी दारिद्र्याचे चटके सहन केले. नवऱ्याने दुसरे लग्न केल्यानंतर त्या घरातून निघून गेल्या. शिक्षक नंतर शिक्षणाधिकारी झाल्या. शिक्षण, समाज आणि राजकारण या क्षेत्रात त्यांनी कार्य केले. "ही चित्तरकथा खोलवर अस्वस्थ करते".[६] सार्वजनिक जीवनात नेतृत्व करणाऱ्या मंडळीनी नैतिक आचारसंहिता व्यक्तिगत पातळीवर राबवावी अशी नैतिक मुल्यांची जाणीव करून दिली. सर्वच पातळीवर बरबटलेल्या समाजजीवनावर त्यांनी परखड भाष्य केले.

मल्लिका अमरशेख यांचे १९८४ साली 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' हे स्वकथन प्रकाशित झाले. यातून प्रखर अन्यायाची जाणीव त्याविरूद्ध आक्रमक भावना व मनाचा निर्धार व्यक्त होतो. "एक स्त्री म्हणून या पुरुष प्रधान संस्कृतीकडे न्याय मागायचा अशी भूमिका घेऊन कथन केलेले आहे. तारुण्याच्या काळात दलित कार्यकर्ता कवी नामदेव ढसाळ यांच्या प्रेमात पडणे, ढसाळांचे दलित जीवन, संघर्ष, आक्रमकपण, बेशुटपणावर खरं तर भाळलेली ही तरुणी पुढे मात्र ढसाळांच्या ह्या बेबंदपणाबाबत चिडते, रडत मात्र नाही.. या आत्मचरित्रातून कवीचे मन, कलासक्त जाणिवा आणि कठोर वास्तव याचा उलगडा होत जातो".[७] मल्लिका अमरशेख यांनी निडरपणे आयुष्यात घडणाऱ्या घटनांचा उलगडा प्रस्तुत स्वकथनातून केलेला आहे.

बेबी कांबळे यांचे 'जिण आमुचं' हे स्वकथन १९८६ साली प्रकाशित झाले. या स्वकथनात त्यांनी स्वत:च्या दु:खाचा पाढा गातानाच कुटुंबाच्या आणि समाजाच्या दु:खाचा मागोवाही घेतलेला आहे. आपल्या व समाजाच्या पूर्वायुष्याचे चित्रण त्यात केले आहे. "पन्नास वर्षाच्या काळातील मला कळत असलेल्या बारीक सारीक गोष्टी न लाजता प्रत्यक्ष त्याची मांडणी केलेली आहे."[८] महार जातीतील चालीरीती, लग्नसोहळे, कुटुंब संस्था, नाती- गोती यांच्या परस्पर संबंधातील तणतणाव यामधून फुललेले जीवन रेखाटलेले आहे. हे जीवन आज मागे पडलेले आहे आणि त्यांनी स्वीकारलेल्या बौद्ध धम्माचे जीवन वेगळे सांस्कृतिक रूप होऊन प्रकट झाले आहे. प्रबोधनाच्या भूमिकेतून आणि समाज सुधारण्याच्या तळमळीतून हे स्वकथन लिहिले आहे. बेबी कांबळे ह्या डॉ. बाबासाहेब यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतात. मागील पिढ्यांचे दुख: नाहीसे करणाऱ्या आपल्या युगंधरामुळे आपल्याला माणूसपण मिळाले अशी कबुली त्या देतात.

शांताबाई दाणी यांचे 'रात्रंदिन आम्हा' हे स्वकथन १९९० साली प्रकाशित झाले. या स्वकथनात त्यांच्या बालपणाच्या प्रसंगापासून तर नोकरी पर्यंतचा प्रवास आलेला आहे. जातीमुळे त्यांना त्रास सहन करावा लागला. त्यामुळे त्या एकट्याच त्या विरोधात उभ्या राहिल्या. अशा झुंजार लेखिकेचे हे स्वकथन आहे. "बालपणातील अनुभव व्यक्त करताना अपमान होऊनही आपल्या मनाचे खच्चीकरण होऊ ध्यायचे नाही हा निर्धार व्यक्त होतो."[९] कुठल्याही प्रकारची तमा न बाळगता मोठ्या निर्धाराने आपल्या जीवनाचा उलगडा शांताबाईनी प्रस्तुत स्वकथनात केलेला आहे. ज्या समाजात शिक्षणाचा अभाव आहे. त्या 'गोपाळ' भटक्या जमातीत जन्मलेल्या जनाबाई गीऱ्हे यांचे 'मरणकळा'(१९९२) हे स्वकथन आहे. जनाबाईनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळे शिक्षणाची कास धरली. मात्र समाजधुरिणांनी त्यात अडथळे आणले. त्यांचे लग्नही मोडले. वडीलांच्या सहकार्याने त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले."जनाबाईचे हे स्वकथन म्हणजे मरणकळा भोगत भोगत परिवर्तनाच्या युद्धात विजयी होणाऱ्या आपल्या एका रणरागीनीचे स्वकथन आहे."[१०] गोपाळ समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांकृतिक परिस्थितीचे दर्शन या स्वकथनातून घडते.

आदिवासी समाजातील पहिल्या आंबेडकरवादी लेखिका म्हणून नजूबाई गावित यांचा नावलौकिक आहे. त्यांनी 'आदोर '(१९९५) हे स्वकथन लिहिले. त्या सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्या आहेत. त्यांनी 'आदोर', 'रोप', 'लावणी' आणि 'परोली' या चार खंडातून स्वकथनाची मांडणी केली आहे. 'आदोर' या शीर्षकातून मानवी मनाचे आणि समाज मनाचे खरे रूप मांडले आहे. "आदोर' घडले नाही तर शेत चांगल पिकत नाही. समाज मनाचे आदोर झाले नाही तर क्रांतीचे पीकही जोमाने बहरून येत नाही. नजूबाईनी शीर्षकात ही अशी मोठी ताकद भरून ठेवली आहे."[११] शीर्षकाच्या सार्थकतेबरोबर आदिवासीच्या अंधश्रद्धा, धर्म भोळेपणा गळून पडाव्या असा आशावाद व्यक्त झालेला आहे. आदिवासी समाजाची उन्नती करायची आहे. त्यामुळे कुणी तरी सुरुवात करणे गरजेचे होते. ही सुरुवात नजुबाई गावित यांनी केली आहे. ही फार अभिमानाची बाब आहे.

Research Hub International Journal

विमल मोरे यांचे 'तीन दगडांची चूल' हे स्वकथन सन २००० साली प्रकाशित झाले. दादासाहेब मोरे यांच्या त्या पत्नी आहेत. त्यांनी बालपण, विवाह, पैशाची चनचन, सासर कडील वातावरण, परंपरा ह्याविषयीची नोंद स्वकथनात केली आहे. "दिवीची फुटू गळ्यात अडकाऊन आणिक पुजारी हाय म्हणून भंडारा लाऊन काय मिळत नाय..?"[१२] भटक्या विमुक्त जमातीमध्ये श्रद्धा-अंधश्रद्धा आहेत. त्यांचे रीतीरिवाज आहेत. सन-उत्सव आहेत. यातून या समाजाने बाहेर पडावे व आपले कल्याण करावे असेच जणू या स्वकथानातून सांगितले आहे.

ऊर्मिला पवार पवार यांचे 'आयदान' हे स्वकथन २००३ साली प्रकाशित झाले. या स्वकथनात स्त्रियांचे राहणीमान, रीतीरिवाज, सण-उत्सव, उद्योगासाठी धडपड, लग्नकार्य यातील रीती, गाणी, या सर्व गोष्टींचा उलगडा आहे. लेखिकेची शिक्षणासाठीची धडपड, समाज परिवर्तनाच्या चळवळीतील सक्रियता, त्यामुळे तिच्या वाट्याला आलेला कौटुंबिक-मानसिक संघर्ष या स्वकथनातून मांडला आहे. "आयदान' म्हणजे बांबूपासून तयार केल्या जाणाऱ्या सुपं, टोपल्या, परड्या, हारे, करंडे यासारख्या वस्तू. कोकणातील महार जातीचा हा परंपरागत व्यवसाय आपल्या आयुष्यातील घटना, प्रसंग, मान-सन्मान, दु:ख इत्यादी एकमेकातील गुंतणे आयदानच आहे. हे प्रतिकात्मक स्वरुपात प्रकट झाले आहे."[१३] उर्मिला पवार यांनी आपल्या समाजातील वेदना, मानहानी, दु:ख यांचे चित्रण केले आहे.

यशोधरा गायकवाड यांचे 'माझे मी' हे स्वकथन २००७ साली प्रकाशित झाले. एका दलित जातीमध्ये जन्माला आल्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. जातीवादाने तर त्यांना खूप छळले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोंबर १९५६ मध्ये नागपूरला लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार केला या ऐतिहासिक घटनेचा प्रभाव त्यांच्यावर पडला. "अशा वेळी मी, माझे चुलत भाऊ आणि ईतर बंधू सात-आठ जनांना एकत्र केले. आणि त्यांना सांगितले की, डॉ. बाबासाहेबानी हिंदू धर्म नाकारून बौद्ध धम्म स्वीकारला आहे. आपणही धर्मांतर केले पाहिजे."१४ त्यांना धर्मांतराची ओढ होती. आपणही या नरकातून मुक्त व्हावे असे ठरविले. त्यांनी बाबासाहेबांच्या हाकेला हो दिला. त्यामुळे त्यांना गावकऱ्यांनी बहिष्कृत केले. त्यांना न जुमानता त्यांनी विद्रोहाची ठिणगी पेटवली. "माझी मी' हे यशोधरा गायकवाड यांचे बाबासाहेबांच्या विचारांचे आणि चळवळीचे तसेच त्या चळवळीचे परिवर्तनात होत असलेल्या रूपाचे दर्शन घडविणारे आत्मकथन आहे. जगतांना अनुभवाच्या पातळीवर त्यांनी स्वत:च्या अस्तित्वाचे परिशीलन केलेले आहे."[१५] डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे यशोधरा गायकवाड यांचे श्रद्धास्थान आणि आदराचे स्थान आहेत. बाबासाहेबांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहचले पाहिजे हा उद्देश मनात ठेवून त्यांनी आपले कार्य सतत सुरु ठेवले. बाबासाहेबांच्या चळवळीने तर येथील समाज व्यवस्था हादरली. याच चळवळीची एक पाईक म्हणून यशोधरा गायकवाड यांचा उल्लेख करावा लागतो.

स्त्रियांची आंबेडकरवादी स्वकथने ही आंबेडकरी चळवळीचे एक साधन आहे. या लेखिकांनी स्वतःचे व समाजाच्या दु:खातील बदल शब्दबद्ध केले आहेत. या लेखिकांची प्रेरणा डॉ. बाबासाहेब असल्यामुळे शोषणापासून मुक्ती हाच स्वकथनाचा केंद्रबिंदू आहे. या स्वकथनात स्वातंत्र्य, समता, न्याय, मानवता ह्या तत्त्वांचा समावेश आहे. "ही स्वकथने म्हणजे मराठी साहित्यात उपेक्षित भारतीय जीवनाची प्रथमच उगवलेली गौरवशाली वाड.मयीन प्रभात आहे,"[१६] असे गौरवोद्गार प्रख्यात समीक्षक यशवंत मनोहर यांनी काढले आहेत.

**स्वकथनातील भाषा**

कोणतीही वाङ्मयकृती ही त्यातील आशय आणि अभिव्यक्ती यातील नूतनतेवर अवलंबून असते. साहित्यकृतीच्या आशयावर भाषाशैलीचे स्वरूप अवलंबून असते. ज्या साहित्यकृतीचा आशय आणि अभिव्यक्ती प्रभावी असते ती साहित्यकृती महत्त्वपूर्ण असते. स्त्रियांच्या आंबेडकरवादी स्वकथनाची भाषा ही आशयसंपन्न आणि वास्तविकतेच्या जवळ जाणारी आहे. खरेतर भाषाशैलीचा आणि आशयाचा अगदी जवळचा सबंध आहे. लेखिकांचे वास्तव्य ज्या ठिकाणी होते त्या प्रदेशातील बोलीभाषेतून ही स्वकथने साकार झाली आहेत. भाषेमुळे प्रभावी क्रांती होऊ शकते हे त्यांनी ओळखले होते. ही स्वकथने जाणिवपूर्वक बोलीभाषेत लिहिलेली आहेत. स्वकथनाची भाषा सामाजिक जाणिवेच्या जवळची आहे. ज्या प्रदेशात त्यांचे वास्तव्य होते त्या प्रदेशाची बोली, तेथील शब्द, वाक्प्रचार यांचा वापर प्रामुख्याने झालेला आहे. त्यामुळे मराठी भाषेमध्ये नव-नवीन शब्दांची भर पडली आहे. बोली भाषेच्या दृष्टीने या स्वकथनांचा अभ्यास व्हायला पाहिजे. यात विदर्भ, कोंकण, मराठवाडा या प्रदेशातील बोलींचा समावेश आहे. जुने

नवीन शब्द ही त्यात दिसतात त्यामुळे स्वकथनांना सजीवत्व प्राप्त झालेले आहे. मराठी साहित्यात ही स्वकथने भाषिक दृष्टीने महत्त्वाची ठरली आहेत.

**निष्कर्ष**

१. स्त्रियांच्या आंबेडकरवादी स्वकथनांनी मराठी साहित्यसृष्टीत एक वेगळा ठसा उमटविला आहे.
२. ही स्वकथने चिरडलेल्या स्त्री-मनाची त्यांच्या भावभावनांची विविध रूपं आहेत.
३. या स्वकथनातून स्त्रियांच्या जीवनाचे व त्यांच्या समाजजीवनाचे दर्शन घडते.
४. आंबेडकरवादी स्त्रियांची स्वकथने ही प्रामुख्याने बालपण, तारूण्य, शिक्षण, विवाह या सोबतच सामाजिक, सांस्कृतिक चळवळीचे दर्शन घडवितात.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून आणि शोषितांच्या उत्थानाच्या डळमळीतून स्वकथनाची निर्मिती झाली.
६. या स्वकथनातील तत्त्वज्ञान स्थिती वादाला नाकारणारे आणि परिवर्तनवादी जीवनमुल्ल्ये स्वीकारणारी आहेत.
७. खेड्यातील आणि शहरातील सामाजिक परिस्थिती व त्यामधील जीवन पद्धतीवर भाष्य करण्यात आले.
८. ही स्वकथने व्यक्ती-जीवनातील वेगवेगळ्या गोष्टी व समाजजीवनातील तत्वे प्रभावीपणे मांडतात.
९. प्रांजळपणा, भेदकता, सरलत्व, विद्रोह, सामाजिक तळमळ, सहज-सरळ निवेदन समाज भावनेचे दर्शन ई. वैशिष्ट्ये दिसून येतात.
१०. यात आकर्षक संवाद व प्रभावी व्यक्तिरेखा आहेत.
११. स्त्रियांची आंबेडकरवादी स्वकथने प्रामुख्याने बोली भाषेतून लिहिली असल्यामुळे त्यांना निराळे सौंदर्य प्राप्त झाले आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. आरती कुलकर्णी, 'दलित स्वकथने : साहित्यरूप', विजय प्रकाशन, नागपूर, १९९१, पृ.४३
२. सदा कऱ्हाडे, 'दलित साहित्य चिकित्सा', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृ. ४३
३. यशवंत मनोहर, 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', भीमरत्न प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ. २७४
४. आरती कुलकर्णी, उनि.,पृ. ६८
५. मुक्ता सर्वगोड, 'मिटलेली कवाडे', चेतश्री प्रकाशन, अंमळनेर, १९८३, पृ. ३६
६. यशवंत मनोहर, उनि.,पृ. २७४
७. माधवी खरात, 'मराठी साहित्य: दलित लेखिकांचे योगदान', माधवी प्रकाशन, पुणे, २०१२, पृ. ५७-५८
८. बेबी कांबळे, 'जिण आमुचं', रचना प्रकाशन, पुणे, १९८६
९. माधवी खरात, उनि.,पृ. ५६
१०. यशवंत मनोहर, उनि.,पृ. २७५
११. तत्रैव, पृ.२७५
१२. विमल मोरे, 'तीन दगडांची चुल', मेहता पब्लिशिंग हाऊस, मुंबई, पृ. ६१
१३. माधवी खरात, उनि.,पृ. ५५
१४. यशोधरा गायकवाड, 'माझी मी', ग्रंथाली प्रकाशन, पुणे, २००७, पृ. २६९
१५. संजय लाटेलवार, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित आत्मकथने', मेहेरबाबा पब्लिशर्स, नागपूर, २०२१, पृ, २५८
१६. यशवंत मनोहर, उनि.,पृ. २७६


Research Hub International Journal